विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई

YUVA

# विश्वकर्मा पंचाल वधू-वर सुचक केंद्र

www.vivah.vssmumbai.com

## ऑनलाईन वधू-वर नोंदणी कार्यपद्धती / नियमावली-अटी

विवाह! हा संस्कार माणसाच्या जीवनातील एक महत्वाचा टप्पा. अनुरूप जोडीदार निवडून आयुष्याचा पुढील प्रवास सुरू करायचा. विश्वकर्मा सुवर्णकार समाज, मुंबई संचालित विश्वकर्मा पंचाल, वधु-वर सूचक केंद्र विद्यमाने युवामंच, मुंबई निर्मित वधू-वर सुचक वेबसाईट पुन्हा नव्याने कार्यान्विन करण्यात आली आहे. या वेबसाईटवर नाव नोंदणी घरबसल्या करु शकता व इच्छुक माहिती मिळवू शकता. या माहितीचे वैशिष्टय असे कि यामध्ये वधू-वराची सर्व आवश्यक माहिती दाखविण्यात येईल. वधू-वर योग्य वाटल्यास, पत्रिकेचा विषय संबधित किंवा अधिक माहितीची पडताळणी करणे, अगर अधिक माहिती मिळविणे हि जबाबदारी वैयक्तिकरित्या घेऊनच विवाह ठरवावा.

खाली वधू-वर नोंदणी कशी करावी तसेच वेबसाईटवर वधू-वर कसे पहावे याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. यानूसार आपण वधू-वर नोंदणी करावी आणि माहिती मिळवावी. अधिक माहितीसाठी वेबसाईटवर दिलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा.

### वधू-वर नोंदणी कशी करावी:

१. प्रथम **www.vivah.vssmumbai.com** वेबसाईटवर जावे.
२. मुखपृष्ठावरील वधू-वर नोंदणी फॉर्म या बटनावर क्लिक करा.
३. विवाह नोंदणी फॉर्मवरील माहीती भरावी.
- प्रथम वधू-वर फोटो अपलोड करताना कमीत कमी (1mb च्याखाली) साईजचा करावा.
- फॉर्मवरील सर्व आवश्यक ती माहिती भरावी. भरलेली माहिती तपासून पहा.
- Terms & conditions लिंक वर क्लिक करा, यामध्ये दाखवले नियम व अटी वाचा. नियम व अटी मान्य करण्यासाठी Check box क्लिक करा.
- यानंतर Submit बटणावर क्लिक करा.

४. आपल्या ई-मेल आयडीवर वेलकम ई-मेल आला आहे का याची खात्री करा. (आपले अकाउन्ट ॲडमिन मान्यतेसाठी राखिव ठेवले असेल, अकाउन्ट ॲक्टिव होण्यासाठी रजिस्ट्रेशन फी भरणे आवश्यक आहे. आपली रजिस्ट्रेशन फी प्रथम भरावी.)
५. माफक २००/- रुपये रजिस्ट्रेशन फी (एकदाच) आकारली जाते.
- QR कोडद्वारे किवा पैसे ट्रान्सफर, डिपॉझिट करण्यासाठी खाली दिलेल्या माहितीचा वापर करावा.

  **Account Name: Vishwakarma Panchal**
  **Bank Name: Saraswat Co-op. Bank Ltd.,**
  **Branch: MadhuKendra, Dadar (w.),Mumbai**
  **A/c. No: 006200102908646**
  **IFSC Code: SRCB0000006**
  **Account Type: Saving (used for RTGS, IMPS and NEFT transactions)**
- वधू-वर मेळाव्यात जर आपण पैसे भरले असतील तर पुन्हा पैसे भरू नयेत.
- जर आपण पैसे स्वत: देणार असाल तर संस्थेच्या कार्यालयात देऊ शकता.

६. आपण पैसे भरल्याची नोंद मिळाली की, अकाउन्ट ॲडमिन कडून ॲक्टिव करण्यात येईल.
७. अकाउन्ट ॲक्टिव झाल्यावर आपल्या ई-मेल आयडीवर Account-Activated ई-मेल आला आहे का याची खात्री करा.
८. Account-Activated ई-मेलवर मिळालेला यूझरनेम आणि पासवर्ड स्वत:कडे नोंद करून ठेवा.

### वेबसाईटवर वधू-वर कसे पहावे:

१. **www.vivah.vssmumbai.com** या वेबसाईट वर जावे.
२. अक्टिव्ह ई-मेल द्वारे मिळालेला यूझरनेम आणि पासवर्ड टाकून लॉग-इन करा.
३. वधू-वर शोधा, अनुरूप वधू-वर, इच्छुक वधू-वर टॅब खाली दिलेल्या माहितीनूसार स्थळे पहा.
- वधू-वर शोधा - (या टॅब मध्ये मोजक्या माहितीनूसार वधू-वर शोधू शकता.)
- अनुरूप वधू-वर - (आवडलेले वधू-वर या टॅबमधून पुन्हा पाहू शकता.)
- इच्छुक वधू-वर - (आपण ज्यांना आवडले आहात त्यांची माहिती या टॅबमधून पुन्हा पाहू शकता.)

पुढील माहिती पान २ वर

४. फिल्टर बटणाचा वापर करून सर्च ऑपशन्स नूसार वधू-वर पाहू शकता.
५. आवडलले वधू-वर लाईक बटण क्लिक करून अनुरूप वधू-वर टॅबमध्ये समाविष्ठ करा.
६. उपलब्ध झालेल्या स्थळावरील "View Details" बटनावर क्लिक करून अधिक माहिती मिळवा.
७. दिलेल्या माहितीनूसार शैक्षणिक योग्यता आणि पत्रिका जमते का पहावी.
८. वधू-वर योग्य वाटल्यास, पत्रिकेचा विषय संबधित किंवा अधिक माहितीची पडताळणी करणे,
अगर अधिक माहिती मिळविणे हि जबाबदारी वैयक्तिकरित्या घेऊनच विवाह ठरवावा.

## नियमावली /अटी

१. दिलेली माहिती सत्य असून त्यास मी पूर्ण जबाबदार राहीन.
२. सदर माहिती मेळाव्याच्या वेळी जाहीर करण्यास माझी संमत्ती आहे.
३. वधू-वरांनी वधू-वर मेळाव्यास उपस्थित राहणे आवश्यक आहे.
४. वधू-वरांचा फोटो जोडणे आवश्यक आहे.
५. वधू-वरांनी दिलेल्या माहितीची पडताळणी करणे, अगर अधिक माहिती मिळविणे हि जबाबदारी वैयक्तिकरित्या घेऊनच विवाह ठरवावा. त्याबाबत संस्था जबाबदार राहणार नाही.
६. वधू-वर संशोधनामध्ये वधू-वर दोन्ही पक्षाचे केवळ संपर्क कार्यालय म्हणून संस्था कार्यरत राहील.
७. भक्कम मध्यस्थी अनोळखीचं ओळखीमध्ये रूपांतर होईपर्यंत राहील नंतरची वाटचाल प्रत्येकाने स्वबळावरच करणेची आहे.
८. आज रोजी संस्थेकडे जी स्थळे उपलब्ध आहेत तीच पाहता येतील अन्यथा अपेक्षित स्थळं मिळेपर्यंत प्रतिक्षेची तयारी असावी.
९. फॉर्मवर लिहिलेल्या कोणत्याही सत्य/असत्य मजकुरास खाली सही करणारी व्यक्ती जबाबदार असेल.
१०. पत्रिकेचा विषय संबधितांनी, ज्योतिषाकडे जाऊन पडताळा घेण्याचा आहे.
११. पसंती नंतर मुलाच्या / मुलीचे पै-पाहुणे, स्वभाव, वर्तुणूक, रोगराई, अफेअर, व्यसन, स्थावर, शैक्षणिक पात्रता, नोकरी, व्यवसाय या संबंधीची चौकशी परस्परांनी आपआपल्या जबाबदारीवर करणेची आहे.
१२. मुला-मुलींचे फोटो इथेच पाहता येतील, घरी दिले जाणार नाहीत.
१३. लग्नानंतर सुदैवाने / दुर्दैवाने उद्भवणार्या चांगल्या / वाईट परिस्थिती आपण संस्थेस जबाबदार धरू नये.
१४. वधू-वर यांचे मध्ये ५ वर्षाचे अंतर असावे त्यापेक्षा जादा अंतर असल्यास संस्थेकडून कोणत्याही प्रकारे सहकार्य केले जाणार नाही.
१५. संस्थेची कार्यपद्धत पारदर्शी असल्याने आपल्या अपेक्षेच्या चाकोरी बाहेरच्या स्थळांचा फोन संपर्क / पत्रव्यवहार होणेची शक्यता नाकारता येत नाही.
१६. विवाह योग हा दोन्ही पक्षाचा प्रतिसाद, परस्पर सहकार्य व तडजोडीवर अवलंबून असल्याने त्याची हमी देता येणार नाही.
१७. विवाह ठरल्यानंतर तात्काळ कळवा! अन्यथा होणाऱ्या पत्रव्यवहारास संस्था जबाबदार राहणार नाही.
१८. पुर्नविवाह इच्छुक वधू वरांनी, घटस्फोटाचे पेपर, मृत्युचा दाखला, पत्नीचे संमतीपत्र झेरॉक्स पत्र जमा करावी. स्थळांची आजची स्थिती कदाचित उद्या असणार नाही.
१९. फोन वरून स्थळे मिळत नाही याची मला कल्पना आहे.
२०. गुंतागुंतीच्या, न्यायप्रविष्ठ स्थळांबाबतचे नोंदणी नाकारण्यात सर्वाधिकार संस्थेने राखून ठेवले आहेत.
२१. सभासद अर्जात भरलेल्या माहितीमुळे संस्थेस नामुष्कीजनक प्रसंग आल्यास मंडळ कायदेशीर कारवाई करेल.
२२. संस्थेकडील माहिती/फोन नं./फोटो याचा गैरवापर होणार नाही. झाल्यास कोणताही पूर्व सूचना न देता माझे नांव रद्द करावे. प्रसंगी कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील.
२३. फॉर्ममध्ये भरलेल्या माहितीची 'सत्यता' मी माझ्या पातळीवर पडताळा घेईन व योग्य वाटल्यास पुढील वाटचाल करील.
२४. वधू-वर संशोधन करताना प्रत्येक पालकाची कार्यपद्धत वेगळी असते तरी ही खिलाडू वृत्तीने मी सर्वांना फोन संपर्क, पत्र व्यवहार करीन.
२५. लग्न ठरल्यानंतर फोटो व माहिती केवळ ३० दिवसांत मी परत नेईन. अन्यथा फोटो माहितीबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.
२६. संस्थेकडून विवाह ठरल्यास कोणतेही, कसलेही शुल्क आकारले जात नाही याची मला कल्पना आहे.
२७. संस्थेकडून फक्त स्थळे सुचविलि जातील.
२८. वधू-वर व पालकांनी फॉर्ममध्ये भरलेल्या कोणत्याही माहितीशी संस्था सहमत असणार नाही.
२९. वरील माहिती मी वाचली ती मला / संबधितांना मान्य असून बंधनकारक राहील.

- **नोंदणी शुल्क फक्त QR कोडद्वारे किवा अकाऊंट नंबरवरच जमा करावेत.**

## ॲडमिन पुढीलप्रमाणे


श्री. सुनिल द. देवरुखकर
8689872352

श्री. मोहन ह. नगरकर
9869669020

श्री. सुनिल स.सागवेकर
7738049203

श्री. अतुल रा. देवरुखकर
9833655089

कु. शुभम रा. सागवेकर
9969583794

श्री. गणेश द. सागवेकर
9221672299

श्री. आशिष अ. पालकर
7718949830

कु. ओमकार सु. सागवेकर
9167339820

विश्वकर्मा पंचाल वधु-वर सूचक केंद्र | युवामंच, मुंबई